# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)

जा.क्र./ गो.वि /महा.वि./ ६८ /२०१६
दिनांक : २६/०४/२०१६
*तातडीचे/कालमर्यादित*

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित
विधी/शिक्षणशास्त्र /शारिरीक शिक्षण महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:– राज्यातील अकृषी विद्यापीठातील उच्च शिक्षणाशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

संदर्भ:–१. शासन निर्णय क्रमांकसीईटी–२०१६/प्र.क्र.८४/मशि–२दि. ७/४/२०१६
२. उशिसं/२०१६/विद्यापीठ अभ्यासक्रम/सीईटी/बी.एड/४९४०दि. ७/०४/२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र तसेच उच्च तंत्र शिक्षण विभाग दि. ७ एप्रिल, २०१६ चा शासन निर्णयाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून आयुक्त राज्य सामायिक प्रवेश परिक्षा यांच्या मार्फत राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता विधी/शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षण या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना माहीतीस्तव व उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे.

सहपत्र:–संदर्भिय पत्र संलग्नित

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी:– १. मा. संचालक, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण म. रा. मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
२. मा. उपसचिव,उच्च तंत्र शिक्षण विभाग मुंबई–४०० ०३२

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३३२२ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 220 दिनांक 16-04-16
जावक क्र. ............ दिनांक ............

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 2542 दिनांक 12/4/16
जावक क्र. 1301 दिनांक 16/5/16

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक उशिसं/२०१६/विद्यापीठ अभ्यासक्रम/सीईटी/बीएड/४८४० दिनांक ०७.०४.२०१६

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, 1805 12/5/16

विषय : राज्यातील अकृषि विद्यापीठातील उच्च शिक्षणाशी सबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक सीईटी-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२, दिनांक ०७.०४.२०१६

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय कृपया पहावा. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांमध्ये चालविल्या जाणाऱ्या विधी पदवी (३ व ५ वर्षीय) व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे / विभागाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून आयुक्त राज्य सामायिक प्रवेश परीक्षा यांच्या मार्फत राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्यांत येणार आहेत. तरी याबाबत नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**राज्यातील अकृषि विद्यापीठातील उच्च शिक्षणाशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-सीईटी-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०७ एप्रिल, २०१६.

वाचा :-

(१) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५,
(२) शासन अधिसूचना क्र.टीईएम २०१५/सीआर नं.५३६/टिई-४, दि. ११.०३.२०१६,
(३) शासन अधिसूचना क्र.बी.एड ४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दि.२२.०१.२०१६,
(४) शासन निर्णय क्र.सीईटी २०१५/प्र.क्र.३७९/मशि-२, दि.०४.१२.२०१५,
(५) शासन निर्णय क्र.सीईटी २०१५/प्र.क्र.४४०/मशि-२, दि.२८.०१.२०१६.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधिन क्र.२ येथील दि.११.०३.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २ (द) अनुसार विभागाच्या अखत्यारितील व्यावसायिक शिक्षणांतर्गत येणारे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केले आहेत. सदर अभ्यासक्रमांमध्ये विधी पदवी अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भाधिन क्र.३ येथील दि.२२.०१.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड या अभ्यासक्रमांना देखील व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भातील क्र.४ व ५ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील विधी पदवी व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे (बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड) प्रवेश आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांमध्ये चालविल्या जाणाऱ्या विधी पदवी व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे/विभागाचे प्रवेश राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांमध्ये चालविल्या जाणाऱ्या विधी पदवी (३ व ५ वर्षीय) व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे/विभागाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा यांच्या मार्फत राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश

प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्यात येतील. त्यामध्ये खालील अभ्यासक्रमांचा/विभागांचा समावेश राहिल :-

| अ.क्र. | विद्यापीठांचा विभाग/अभ्यासक्रमाचे नाव | सामायिक प्रवेश परीक्षेचा स्तर | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| | विधी पदवी<br>(अ) तीन वर्षीय विधी पदवी<br>(ब) पाच वर्षीय विधी पदवी (इंटिग्रेटेड) | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा | आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |
| | शिक्षणशास्त्र<br>(अ) बी. एड<br>(ब) एम. एड | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा | आयुक्त ,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |
| | शारिरीक शिक्षण<br>(अ) बी. पी. एड<br>(ब) एम. पी. एड | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा | आयुक्त ,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४०७१५५९४४४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rohini Bhalekar
Date: 2016.04.07 16:08:57 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
४) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
५) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८) निवडनस्ती-मशि-२.